महाराष्ट्र शासन
वस्त्रोद्योग विभाग
**रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
नवीन प्रशासकीय इमारत क्र.२, ६ वा माळा, बी-विंग, आयुक्त कार्यालय परीसर, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
दूरध्वनी : 0712 2569926 ई-मेल : dos.maha@gmail.com संकेतस्थळ : www.mahasilk.maharashtra.gov.in

# जाहीरात

रेशीम संचालनालय महाराष्ट्र राज्य, नागपूर अंतर्गत **रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, गट-ब (अराजपत्रित)** व **वरीष्ठ अधिक्षक, गट-ब (अराजपत्रित)** या सवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांची नामिकासूची करण्यांचे नियोजित आहे.

या नामिकासुचितील अधिका-यांमार्फत खालील कामे करुन घेण्यांत येतील.

**1.गडचिरोली येथे टसर विकासाकरीता बायफ या संस्थेमार्फत विशेष प्रकल्प राबविणे.**

**2.जळगाव जिल्हयात तुती रेशीम उत्पादन वाढ व विकासाकरीता विशेष मोहीम राबविणे. तसेच, रेशीम विकास अधिकारी पद रिक्त असलेल्या जिल्हयात विस्तार कामकाज तथा शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे.**

**3.रेशीम उत्पादनात वाढ होण्याकरीता किटक संगोपनाबाबतचे तत्सम मार्गदर्शन, शंकानिरसन करणे तसेच, प्रशासकीय कामकाजावर संनियंत्रण करणे**

**4.नर्सरी व कोष उत्पादन बाबचे प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे.**

या जाहीरातीद्वारे करावयाची नामिकासूची शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१० जून २०२५ मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल. व करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांना याच शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक देण्यांत येईल. कामाचे **मुख्यालय जिल्हा रेशीम कार्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली, तसेच जिल्हा रेशीम कार्यालय जळगावं, मा. संचालक यांचे निर्देशानुसार, विस्तार कामाच्या आवश्यकतेनुसार मुख्यालयामध्ये बदल करण्यात येईल.**

नामीकासुचीत समाविष्ट झाल्यामुळे सेवानिवृत्त अधिका-यास काम मिळेल याची कोणतेही हमी देण्यात येणार नाही. अधिका-यांचा रेशीम विस्तार कामकाजाचा/रेशीम विभागातील प्रशासकीय कामकाजाचा अनुभव व त्यांचा अभ्यास त्यांनी दिलेली सेवा याचा विचार करुन आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीकरीता वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यांत येईल. तसेच रेशीम संचालनालयातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी पुर्वी केलेल्या सेवेस प्राधान्य देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी www.mahasilk.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच रेशीम संचालनालय म.रा.नागपूर येथील नोटीस बोर्डवर देण्यात आलेल्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी दि. 31/7/25 पर्यंत आपले अर्ज PDF मध्ये dos.maha@gmail.com या E-mail Id वर सादर करावेत तसेच अर्ज केलेल्या सेवानिवृत्त अधिका-यांनी मुलाखतीकरीता दि. ---- रोजी सकाळी ---- वाजता खालील पत्यावर रेशीम संचालनालयात उपस्थित रहावे. पत्रव्यवहाराचा पत्ता : रेशीम संचालनालय महाराष्ट्र राज्य, नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ६ वा माळा,बी-वींग,आयुक्त कार्यालय परीसर, सिव्हील लाईन, नागपूर-४४० ००१

विनय मून,(भा.प्र.से.)
संचालक (रेशीम),म.रा.नागपूर

## नामिकासूचीतील सेवानिवृत्त अधिका-यांसाठी अटी व शर्ती

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१० जुन, २०२५ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नामिकासूची तयार करण्यात येईल. सदर नामिकासूचीची वैधता ३ वर्ष राहील.

२. करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त १ वर्षासाठी देण्यात येईल. नियुक्तीच्या आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. परंतू एकूण कालावधी ३ वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नस्ती अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेशावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

४.सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१० जुन, २०२५ मधील तरतूदीनुसार मासिक परिश्रमिक अनुज्ञेय राहील.

५.करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

६.करार पध्दतीने नियुक्ती करतांना वयाची कमाल मर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसेल.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने नेमून दिलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित सेवानिवृत्त अधिकारी यांची राहील, याबाबतचे बंध पत्र/हमीपत्र संबंधित अधिकारी यांनी सादर करणे आवश्यक राहील.

८. अशा अधिका-याविरुध्द कोणतेही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबतची खातरजमा करण्यात येईल.

९. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-याच्या करार पध्दतीवर सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०.करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अश्या कोणत्याही व्यावसायिक,गुंतलेली नसावी.

११.करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या अधिका-यांना वाहन अनुज्ञेय/उपलब्ध असणार नाही तसेच अशा अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१४.करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेले अधिकारी रेशीम संचालनालय म.रा.नागपूर या कार्यालयाचे नियंत्रणाखाली कार्यरत असतील.

१५. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामकाजाचे मुल्यमापन करतील.

१६. करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तींनी तयार केलेले अहवाल/प्रस्ताव रेशीम संचालनालयाच्या मान्यतेअंती शासनास सादर करता येईल.

१७. करार पध्दतीने घेण्यांत आलेल्या अधिकारी यांना सोपविण्यांत येणा-या कामकाजाचे स्वरुप रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अंतीम निर्णयाने ठरेल.

१८. करार पध्दतीने घेण्यांत आलेल्या अधिकारी यांची बैठक व्यवस्था उपलब्ध असलेल्या जागेनुसार करण्यांत येईल.

१९. करार तत्वावर नेमलेल्या अधिका-यांना अर्जित,नैमितिक,व वैद्यकिय रजा अनुज्ञेय असणार नाही. तसेच कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असून प्रसंगी सार्वजनिक सुट्टीचे दिवशी देखील कार्यालयात उपस्थित राहून नेमून दिलेले उद्दीष्ट पूर्ण करणे आवश्यक राहील.

२०. इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी त्यांचे अर्ज, शारिरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र,आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह हि जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दि.३१-७-२०२५ पर्यंत टपालद्वारे/हस्तपोच/ई-मेल द्वारे dos.maha@gmail.com सादर करावे.

विहीत नमुन्यातील अर्ज www.mahasilk.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संपर्क- रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नविन प्रशासकीय इमारत क्र.२, ६ वा माळा, बी-विंग, आयुक्त कार्यालय परिसर, सिव्हिल लाईन, नागपूर -४४०००१

दुरध्वनी- ०७१२-२५६९९२६

२१. करार पध्दतीने घेण्यांत आलेल्या अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१० जुन, २०२५ मधील अटी व शर्ती लागू राहील.

विनय मून,(भा.प्र.से.)
संचालक (रेशीम),म.रा.नागपूर

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त रेशीम विकास अधिकारी श्रेणी -२ व वरिष्ठ अधिक्षक (गट-ब अराजपत्रित ) यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज

उमेदवाराने
अलीकडील
काळातील स्वत:चे
छायाचित्र येथे
चिकटवावे

१. अर्जदाराचे संपुर्ण नांव :
२. पत्रव्यवहाराचा पत्ता (कायमचा) :
३. भ्रमणध्वनी क्रमांक :
४. ई-मेल आयडी (आवश्यक) :
५. जन्म दिनांक :
६. सेवानिवृत्तीचा दिनांक :
७. अर्जदार सादर करतेवेळी वय :
८. शैक्षणिक अर्हता :
९. सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाचे नांव व पत्ता :
१०. सेवानिवृत्त झालेल्या पदाचे नांव :
११. सेवानिवृत्तीच्या दिवशी अंतीम वेतन :
१२. सध्या मिळणारे निवृत्तीवेतन (आयोग नमूद करण्यांत यावा) :
१३. एकूण शासकीय सेवा कालावधी व त्याबाबतचा तपशिल :
१४. सोपविण्यात येणा-या कामाबाबतचा अनुभव आहे कां ? असल्यास त्याबाबतचा तपशिल (अनुभव असल्यास प्राधान्य) : होय/नाही
१५. शासकिय सेवेत असतांना कधी विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही झाली कां? झाली असल्यास त्याबाबतचा तपशिल : होय/नाही
१६. सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयातून अंतीम विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही सुरु आहे कां ? याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र जोडले आहे कां? : होय/नाही
१७. शारिरीक/मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबतचा डॉक्टरांचा दाखला जोडला आहे कां? : होय/नाही
१८. सेवानिवृत्तीच्या वेतनाच्या प्रदान आदेशाची प्रत (PPO) जोडली आहे कां? : होय/नाही
१९. संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान आहे कां? असल्यास तपशिल : होय/नाही

उपरोक्त अर्जात नमूद केलेली माहिती सत्य असून त्यात कोणतीही माहिती खोटी नाही-विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने जाहिरात/सुचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी